**<u>भुसंपादन निर्देशन अर्ज क्र. ९१/२०१९ मधील निशाणी क्र.१४ कडील अर्जावर आदेश.</u>**

१) प्रस्तुतचा अर्ज गैरअर्जदार क्र. १ तर्फे त्यांच्याविरुध्द निशाणी क्र. १ वर दिनांक ०८/०२/२०२१ रोजी पारीत करण्यात आलेला प्रकरण विना लेखी जबाब चालविण्याचाबाबतचा आदेश रद्द करुन त्यांचा लेखी जबाब दाखल करण्यास परवानगी मिळण्याकरीता दाखल केला आहे. प्रस्तुतचा अर्ज वाचला.

२) प्रस्तुत अर्जास अर्जदाराचे म्हणणे घेण्यात आले आहे. अर्जदारातर्फे प्रस्तुत अर्जास दिलेल्या म्हणण्यामध्ये असे कथन केले आहे की, योग्य तो आदेश पारीत करावा.

३) प्रस्तुत अर्जाच्या युक्तीवादाकामी गैरअर्जदार क्र. १ च्या विद्वान वकीलांना पुकारले असता गैरहजर असल्याने प्रस्तुत अर्जावर गैअर्जदार क्र. १ तर्फे युक्तीवाद नाही असा आदेश प्रस्तुत अर्जावर पारीत केला आहे. प्रस्तुत अर्जाच्या कामी अर्जदारातर्फे विद्वान वकील श्री शिंदे यांचा युक्तीवाद ऐकला. रोजनाम्याचे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले.

४) अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन करता असे दिसुन येते की, गैरअर्जदार क्र. १ यांनी या कामी मुदतीमध्ये त्यांचा लेखी जबाब दाखल न केल्याने प्रस्तुतचा भुसंपादन निर्देशन अर्ज गैरअर्जदार क्र. १ यांच्याविरुध्द विना लेखी जबाब चालविण्याबाबतचा आदेश निशाणी क्र. १ वर दिनांक ०८/०२/२०२१ रोजी पारीत केला आहे. त्यानंतर गैरअर्जदार क्र. १ तर्फे प्रस्तुतचा अर्ज दिनांक ०४/०८/२०२२ रोजी दाखल केला आहे. प्रकरणाचे स्वरुप आणि अर्जातील नमुद कारण विचारात घेता माझ्या मते गैरअर्जदार क्र. १ याला या कामी त्यांचा लेखी जबाब दाखल करण्याची संधी देवुन प्रस्तुतचे प्रकरण गुणवत्तेच्या आधारे निकाली काढणे न्यायाचे व उचित ठरेल.

त्यामुळे वरील नमूद कारणांमुळे माझ्या मते प्रस्तुतचा अर्ज मंजुर करणे न्यायाचे व उचित ठरेल. सबब हे न्यायालय न्यायाच्या दृष्टीने खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात येतो व त्यानूसार गैरअर्जदार क्र. १ यांच्याविरुध्द निशानी क्र. १ वर दिनांक ०८/०२/२०२१ रोजी पारीत केलेला प्रकरण विना लेखी जबाब चालविण्याबाबतचा आदेश रद्द करुन गैरअर्जदार क्र. १ यांना त्यांचा लेखी जबाब दाखल करण्यास परवानगी देण्यात येते.

२. वरीलप्रमाणे न्यायालयात आदेशाचे कथन करुन घोषीत करण्यात आला.

Digitally signed by PANDURANG LIMBAJI GHULE
Date: 2022.09.02 11:40:31 +0530

(पां.लिं. घुले)

दिनांक–०१/०९/२०२२ दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, दारव्हा.